मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०२३। पान १

# अखिल मराठा समाज बांधवांचे मोशी प्राधिकरणात एकदिवसीय आंदोलन!

## जेजुरी देवस्थानचे मा.मुख्य विश्वस्त तुषार सहाणे यांचा पुढाकार

**मोशी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मराठा आरक्षणासाठी आपले जीवन पणाला लावणारा शिवयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला अनेक ठिकाणाहून पाठिंबा दर्शविला जात आहे. मोशी प्राधिकरणातून अखिल मराठा समाज बांधवानी एकदिवसीय आंदोलन करून घोषणा देऊन पाठिंबा दर्शविला आहे. जेजुरी देवस्थानचे मा.मुख्य विश्वस्त तुषार सहाने यांच्या पुढाकारातून हे आंदोलन घेण्यात आले.




मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र मिळावे,तसेच शिक्षण आणि नोकरी यामध्ये मराठा समजला आरक्षण मिळावे म्हणून एक संघर्ष युद्ध सुरू केले आहे.हो आम्ही याला युद्धच म्हणू,कारण यात कोणताही राजकीय पक्ष,संघटना यांचा सहभाग नसून केवळ मराठा समाज एकत्र येऊन आपल्या न्याय हक्कांसाठी आज दिल्लीच्या तख्ता वरती निधड्या छाती उभा ठाकला आहे.

खरं तर मराठा समाज हा त्या स्फुलिंगासारखा आहे,लवकर पेटत नाही आणि पेटला तर मग विझत नाही.

त्यामुळे आता या नव्याने पेटलेल्या विस्तवावर्ती कोणी पाय ठेवू नये. खरं तर मनोज जरांगे पाटलांनी एक महिन्याचा वेळ देवूनही या सरकारला जाग आली नाही,म्हणून आता मराठा समाज थांबणार नाही, तो उसळणार! त्याची सुरुवात संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली आहे.मराठा लढतोय.आणि मराठा एकदा लढायला लागला की काय होते हे इतिहास सांगतोच.

त्या शिवयोध्याला पाठिंबा देण्यासाठीच मोशी प्राधिकरणातील संतनगर चौकात एकदिवसीय आंदोलन घेतले आहे, अशी माहिती अखिल मराठा समाज बांधव आणि तुषार सहाणे यांनी दिली.

# अतिरिक्त आयुक्तांनी केली कचरा स्थानांतर केंद्राची पाहणी

## कामे जलदगतीने करण्याचे संबधितांना दिले निर्देश

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवड महानगरपालिके चे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी कासारवाडी आणि गवळीमाथा येथील कचरा स्थानांतर केंद्र तसेच भोसरी तलावाचे पुनरुज्जीवन व सुशोभिकरण या कामांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि कामे जलदगतीने करावीत असे निर्देशही संबंधितांना दिले.



कासारवाडी आणि गवळीमाथा येथील प्रकल्पांना भेट दिल्यानंतर अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (एन सी ए पी) अंतर्गत कासारवाडी आणि गवळीमाथा येथील घरघुती घातक कचरा प्रक्रियेसाठी उभारण्यात येत असलेल्या प्रक्रिया केंद्र आणि अमृत २.० या उपक्रमातंर्गत अंतर्गत भोसरी मैलाशुध्दीकरण केंद्र बांधणीचा आढावा घेतला तसेच तेथील बांधकाम प्रक्रियेची माहिती घेतली.

या पाहणी दरम्यान त्यांच्या सोबत सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, क्षेत्रीय अधिकारी आण्णा बोदडे, उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता अनिल भालसाखळे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे तसेच उपअभियंता योगेश आल्हाट उपस्थित होते.

त्यानंतर अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी चिखली तसेच जाधववाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्रास भेट दिली. तसेच चिंचवड येथील मैलाशुध्दीकरण केंद्राच्या पाहणी दौऱ्यावेळी तेथील स्काडा तंत्रज्ञानाबाबतची माहिती घेतली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल, उपअभियंता सोहन निकम, राजेंद्र मोराणकर ( झउचउ ) उपस्थित होते.

# जरांगे पाटील यांचे उपोषण मागे!

## सरसकट समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार सकारात्मक

**पिंपरी | न्यूज एक्सप्रेस मराठी|** सरसकट मराठ्यांना आरक्षण मिळणार असेल तर राज्य सरकारला वेळ वाढवून देतो म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले आहे. परंतु, ही शेवटची वेळ असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. मराठा आरक्षणाप्रश्री राज्य सरकार गंभीर असून त्यासाठी ८ डिसेंबर रोजी विशेष अधिवेशन बोलवू असे आश्वासन धनंजय मुंडे यांनी मनोज जरांगे यांना दिले. त्यावर २४ डिसेंबर पर्यंत मी वेळ वाढवून देत असल्याचे सांगत जरांगे यांनी शेवटचा इशारा देत उपोषण मागे घेतले आहे.

अखेर राज्य सरकारला महाराष्ट्रातील पेटलेला वाद तात्पुरती शांत करण्यात यश आले आहे. आज राज्य सरकारने शिष्टमंडळ जालन्यात पाठवले होते यावेळी जरांगे पाटील यांची समजूत काढण्यात नेत्यांना यश आल्याचे दिसून येत आहे. .मनोज जरांगे आणि समस्त मराठा समाजाची समजूत काढण्यासाठी सरकार तर्फे शिष्टमंडळ जालन्यात पाठवण्यात आले. त्यावेळी सरसकट समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. त्यासाठी



८ डिसेंबर रोजी विशेष अधिवेशन बोलवण्यात येईल. तसेच हा प्रश्न घाई गडबडीत सोडवता येणार नाही असे शिष्टमंडळाचे म्हणणे होते.शिष्टमंडळाच्या म्हणण्यानुसार, त्यांना २ जानेवारीची मुदत हवी होती. परंतु, सरकारचे ऐकत २ जानेवारी ऐवजी २६ डिसेंबर ही शेवटची वेळ असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. मनोज जरांगे यांच्याशी मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्र यासंदर्भात न्यायमूर्ती यांनी चर्चा केली. ही चर्चा सुरु असतानाच राज्य सरकारच्यावतीनं मंत्री उदय सामंत, मंत्री धनंजय मुंडे, मंत्री संदिपान भुमरे, मंत्री अतुल सावे यांच्यासह आमदार उपस्थित होते. न्यायमूर्ती आणि राज्य सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा झाल्यानंतर मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला वेळ देण्यास तयार असल्याचं म्हटलं. मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी २ जानेवारी २०२४ पर्यंत मुदत दिली आहे. निवृत्त न्यायमूर्ती एम.जी. गायकवाड आणि सुनिल सुक्रे यांनी मराठा समाज मागास असल्याचं सिद्ध होत नाही, असं निरीक्षण कोर्टानं नोंदवल्याचं मनोज जरांगे यांनी सांगितलं. राज्य सरकारकडून अहवाल तयार करण्यात येत आहे. घाई गडबडीत घेतलेला निर्णय कोर्टात टिकत नाही, असं देखील गायकवाड आणि सुक्रे यांनी सांगितलं. मराठा समाजाला मागास ठरवण्यासाठी नवा राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती देखील जरांगे यांना देण्यात आली. यावर न्यायमूर्ती यांनी ज्यांच्याकडे कुणबीच्या नोंदी असतील त्यांच्या रक्त संबंधातील नातेवाइकांना प्रमाणपत्र देण्यात येतील, न्यायमूर्ती यांनी सांगितलं.

निवृत्त न्यायमूर्तींकडून मराठा आरक्षणासाठी नव्यानं अहवाल तयार केला जात असल्याची माहिती देखील मनोज जरांगे यांना देण्यात आली. मराठा समाजाचं सर्वेक्षण करण्यासाठी एकापेक्षा अधिक संस्थांची नियुक्ती करण्यात यावी, असं देखील जरांगे म्हणाले. रा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी दोन महिन्यांचा वेळ देण्यास तयार आहे, असं म्हटलं.

आता देत असलेला वेळ शेवटचा असून या वेळी दगाफटका झाल्यास मुंबईच्या दिशेनं आगेकूच करायचं, राज्य सरकारच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय नाड्या बंद करायच्या, असं मनोज जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांच्याकडून राज्य सरकारला नवी डेडलाइन देण्यात आलेली आहे. २ जानेवारी ही डेडलाइन मनोज जरांगे यांनी दिली. ज्य सरकारतर्फे अंतरवाली सराटीमध्ये दाखल झालेल्या मंत्री धनंजय मुंडे यांनी ७ डिसेंबरला अधिवेशन सुरु झालं की ८ डिसेंबरला मराठा आरक्षणासाठी सर्वपक्षीय प्रस्ताव मांडण्याची तयारी असल्याचं आश्वासन मनोज जरांगे यांना दिलं. शिंदे समितीनं राज्यभरात काम करावं, कुणबी नोंदी आढळतील त्यांच्या रक्तातील नातेवाईकांना जात प्रमाणपत्र देण्यात यावं, असं म्हटलं. राज्य सरकारला २ जानेवारीपर्यंत वेळ देत आहे. आज उपोषण स्थगित करत असलं तरी साखळी उपोषण सुरु राहणार असल्याचं मनोज जरांगे म्हणाले.

### सरकारने दगाफटका केला तर

» राज्य सरकार आपल्याकडे वेळ मागतंय. आपण मराठ्यांनी फक्त त्यांच्यावर विश्वास ठेवायचा आहे. परंतु, जर या दोन महिन्यांत राज्य सरकारने काही दगा-फटका केला तर यांच्या नाड्या आवळायच्या. मी उपोषण मागे घेतल्यानंतर आठ दिवसांत बरा होऊन परत येईन. त्यानंतर पुन्हा एकदा राज्याचा दौरा करू. राज्यातल्या गावागावातल्या लोकांना भेटू. दोन महिन्यांनी काय होतं ते पाहू. गेली ३५-४० वर्षे आपण वाट पाहिली आहे. आता अजून दोन महिने वाट पाहू. परंतु, आता यांनी दगाफटका केला तर आपण यांच्या पूर्ण नाड्या बंद करू. यांची आर्थिक नाडी बंद करू. यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक नाड्या बंद करू, म्हणजेच मुंबईची नाकेबंदी करू. मुंबईचं नाक बंद करून टाकू. राज्यातल्या सगळ्या मराठ्यांना 'चलो मुंबई८२१७;चा नारा देऊ. सरकारमधील लोकांना घराबाहेर पडता आलं नाही पाहिजे. त्यासाठी मुंबईत ठिय्या मांडू.

# फटाका स्टॉलची परवानगी घ्या

## अन्यथा कारवाई; महापालिकेचा इशारा

**पिंपरी-चिंचवड| न्यूज एक्सप्रेस मराठी|** दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असून फटाका विक्रीचे अनेक स्टॉल परवानगी न घेताच उभारले जातात. त्यामुळे महापालिकेने कडक धोरण स्वीकारले आहे. परवानगी घेऊनच स्टॉल उभारावेत. बेकायदेशीर फटाका स्टॉलवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील विविध भागातून फटाका स्टॉलसाठी ६० जणांनी परवानगी घेतली आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विविध भागात फटाके स्टॉल उभारले जातात. या फटाका स्टॉलसाठी महापालिकेच्या अग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रीय कार्यालयाकडून शुल्क आकारून परवानगी देण्यात येत आहे. तसेच मोकळ्या जागेवर परवानगी दिली जात नसल्याचेही अग्निशमन विभागाकडून सांगण्यात आले. आगीच्या घटना टाळण्यासाठी स्टॉलशेजारी वाळू ठेवावी. फटाका स्टॉल परिसरात, बिडी, सिगारेट पेटवू नये.स्टॉल परिसरात ज्वलनशिल पदार्थ ठेवू नये.फटाका स्टॉलपासून लहान मुलांना दूर ठेवावे. महापालिकेचा अग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रीय कार्यालयाकडून फटाका स्टॉलसाठी परवानगी देण्यात येत आहे. यांना अग्निशामक विभागाने परवानगी दिली आहे. तसेच आठही क्षेत्रीय कार्यालय परिसरात बेकायदेशीर फटाका स्टॉल उभारल्यास क्षेत्रीय कार्यालयाच्या अतिक्रमण विभागातर्फे कारवाई करण्यात येणार आहे.अग्निशामक विभागाने १ हजार रूपये परवानगी शुल्क आकारून ६० फटाका स्टॉलधारकांना परवानगी दिली आहे.

# अधिकचे भाडे आकारणी करणाऱ्या वाहतुकदारांविरुद्ध तक्रार करा

**मोशी| न्यूज एक्सप्रेस मराठी|** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर खासगी वाहतूकदारांनी प्रवाशाकडून निर्धारित केलेल्या भाड्यापेक्षा अधिक भाडे आकारणी केल्यास प्रवाशांनी पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या ह१४ॲिशर्लीेपसारळश्र. लो या ईमेल पत्त्यावर तक्रारी किंवा पुरावे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. खाजगी प्रवासी बसेसची सेवा पुरविणारे वाहतूकदारांनी संबंधित मार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने वाहतूक सेवेकरीता आकारण्यात येणाऱ्या भाड्याच्या कमाल दीडपटपर्यंत भाडे आकारता येईल. अधिक भाडे आकारल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा आढळून आल्यास अशा वाहतूक पुरवठादारांवर मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांतर्गत खटला दाखल करण्यात येणार आहे.

# शहरातील कचरा प्रश्न पेटला!

## स्वच्छ सेवा संस्थेबरोबरचा पालिकेचा करार संपुष्टात

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** घरोघरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या स्वच्छ सेवा सहकारी संस्थे बरोबरचा महापालिकेचा करार संपुष्टात आला आहे. स्वच्छ बरोबर करार करण्यासंदर्भातील बैठक लांबणीवर पडल्याने ऐन सणाच्या काळात कचरा संकलन व्यवस्थेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्वच्छ संस्थेबरोबर करार न झाल्याने दिवाळीत शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेला कसरत करावी लागणार आहे. करार लांबणीवर पडत असल्याने यंदा दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय स्वच्छ सेवकांनी घेतला आहे. कचरा संकलनासाठी महापालिकेने स्वच्छ सेवा सहकारी संस्थेबरोबर एक वर्षांचा करार केला होता. ही मुदत २५ ऑक्टोबर रोजी संपुष्टात आली. संस्थेबरोबर दीर्घकालीन करार करावा, अशी स्वच्छ संस्थेची मागणी आहे. त्यासंदर्भात स्वच्छच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्या बरोबरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही तशी मागणी केली आहे. गेल्या तीन वर्षांपासून स्वच्छ संस्थेला सातत्याने अल्प काळाची मुदत देण्यात येत आहे. यासंदर्भात स्वच्छचे पदाधिकारी गेल्या एक महिन्यापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्याचा प्रयत्न करत आहेत. स्वच्छ बरोबर दीर्घकालीन करार केला जाईल, असे आश्वासन शिंदे यांनी दिले आहे. मात्र, यासंदर्भात अद्यापही त्यांनी बैठक घेतलेली नसून, आज (१ नोव्हेंबर) मुंबई येथे होणारी बैठकही शेवटच्या क्षणी रद्द करण्यात आली. त्यामुळे स्वच्छला मुदतवाढ मिळणे लांबणीवर पडले आहे. शहरात प्रतीदिन २ हजार ते २ हजार २०० मेट्रिक टन एवढा कचरा निर्माण होतो. सणाच्या कालावधीत कचरा निर्माण होण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढते. स्वच्छ संस्थेबरोबर करार न झाल्यास शहरात कचऱ्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. करार संपुष्टात आल्यानंतरही सध्या स्वच्छ सेवकांकडून कचरा संकलन केले जात आहे. मात्र, करार लांबणीवर पडल्याने आणि अल्पकाळासाठी सातत्याने मुदतवाढ देण्यात येत असल्याने स्वच्छ कर्मचाऱ्यांमध्येही नाराजीचा सूर आहे. गेल्या सतरा वर्षांपासून स्वच्छ संस्था शहरातील घरोघरी जाऊन कचरा संकलन करत आहे. शहरातील ९ लाख ६५ हजार मिळकतींमधील कचरा स्वच्छ कर्मचाऱ्यांकडून संकलित केला जात आहे. मात्र, महापालिकेच्या पातळीवर स्वच्छच्या प्रारूपाचे खच्चीकरण गेल्या काही वर्षांपासून सुरू करण्यात आले आहे. स्वच्छ संस्थेचे काम काढून घेत एका खासगी संस्थेला हे काम देण्याचा प्रयत्नही महापालिकेच्या स्तरावर करण्यात आला होता.



> **“मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर येत्या काही दिवसांत बैठक होईल. करार संपला असला तरी स्वच्छकडून कचरा संकलनाचे काम सुरू आहे. नागरिकांना दिवाळीत गैरसोयीला सामोरे जावे लागू नये, याची दक्षता स्वच्छ सेवक निश्चित घेईल. मात्र, अल्पकाळाचे करार होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे यंदा दिवाळी साजरी न करण्याची भूमिका स्वच्छ सेवकांनी घेतली आहे.**
>
> **— हर्षद बर्डे, संचालक, स्वच्छ सेवा सहकारी संस्था**

> **“स्वच्छ संस्थेबरोबर करार करण्याची महापालिकेची भूमिका आहे. दीर्घकालीन करार करण्याची त्यांची मागणी आहे. त्यासंदर्भात बुधवारी होणारी मुंबईतील बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र महापालिका आयुक्त आणि स्वच्छ पदाधिकारी यांच्यात लवकरच बैठक होईल. चर्चेतून योग्य तो निर्णय घेतला जाईल.**
>
> **— संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महापालिका**

# आणखी एका दहशतवाद्याला अटक!

## पुण्यासह काही शहरांमध्ये घातपाताचा कट

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** इस्लामिक स्टेट्च्या पुणे मॉड्युलप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आणखी एका दहशतवाद्याला अटक केली आहे. महंमद शाहनवाज आलम (वय ३१, मूळ झारखंड), असे अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्याचे नाव आहे. जुलै महिन्यात कोथरूड येथे दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली तेव्हा आलम पसार झाला होता. आलम याचा दहशतवादी कारवायांमध्ये सक्रिय सहभाग आढळून आला आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) शोध घेत असलेल्या महंमद युनूस महंमद याकू साकी (वय २४) आणि महंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय २३) यांना कोथरूड पोलिसांनी जुलै महिन्यात अटक केली. त्यांचा साथीदार आलम पसार झाला होता. तेव्हापासून तपास यंत्रणा त्याचा शोध घेत होत्या. लपण्याचे ठिकाण शोधण्यात, शस्त्र चालवण्याचे




आणि स्फोटकांचे सराव वर्ग आयोजित करण्यात आलमचा सहभाग होता. पुणे पोलीस आणि राज्य दहशतवादी विरोधी पथकाने (एटीएस) दहशतवाद्यांना अटक करून 'इस्लामिक स्टेट'चे (आयएस) महाराष्ट्र मॉड्यूल उद्ध्वस्त केले. साकी आणि खान यांनी पुणे आणि सातारा येथील जंगलात बॉम्बस्फोट केले होते. या दोघांना राहण्यास खोली देणारा अब्दुल कादिर दस्तगीर पठाण आणि आर्थिक मदत करणारा मेकॅनिकल अभियंता सिमाब नसरुद्दीन काझी यांना 'एटीएस'ने अटक केली. या दहशतवाद्यांनी पुण्यासह काही शहरांमध्ये घातपाताचा कट आखला होता. 'एनआयए'ने महाराष्ट्र मॉड्यूलप्रकरणी डॉ. अदनान सरकार याला कोंढव्यातून अटक केली. मुंबई, ठाणे आणि पुण्यातून यापूर्वी ताबिश नासीर सिद्दीकी, जुबेर नूर महंमद शेख अबू नुसैबा, शर्जिल शेख आणि झुल्फिकार अली बडोदावाला यांना अटक करण्यात आली. तरुणांची माथी भडकवून त्यांना 'आयएस'मध्ये भरती करून घेण्याचे महाराष्ट्र मॉड्यूल दहशतवाद्यांनी आखले होते. या दहशतवाद्यांच्या सूचनेनुसार साकी आणि खान घातपाताचा कट आखत होते.

# एसटी सेवा कधी पूर्ववत होणार!

## पुणे विभागातील एसटी सेवा आजपासून पूर्ववत होणार?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा समाजाचे आंदोलन मागे घेतल्यानंतर राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने शुक्रवारी सकाळपासून सर्व मार्गावरील बस सेवा सुरळित करण्याचा निर्णय घेतला आहे. तर, गुरूवारी रात्रीपासूनच इतर विभागाच्या अकडून पडलेल्या गाड्या सोडण्यास सुरूवात केली. त्यामुळे अडकून पडलेल्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. मराठा समाजाच्या आंदोलनामुळे शनिवारी रात्रीपासून पुण्यातून मराठवाडा, विदर्भात जाणाऱ्या सर्व बस बंद करण्यात आल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांचे हाल सुरू होते. तसेच, एसटीचे देखील नुकसान होत होते. गेले दोन दिवस पुण्यातून जाणाऱ्या ७८० फेऱ्या रद्द केल्या जात होत्या. खासगी वाहन चालकांकडून प्रवाशांची लुटमार सुरू होती. अखेर गुरूवारी रात्री मराठा आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर एसटी महामंडळाने पुण्यातून त्यांची सर्व बस सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे विभागातून साधारण दिवसाला साडेतेराशे एसटी बसच्या फेऱ्या सुरू असतात. त्या सर्व पूर्ववत



केल्या जाणार आहेत. तसेच, रात्री दहानंतर इतर आगाराच्या पुण्यात अडकून पडलेल्या बस रवाना केल्या जाणार आहेत, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली. पुणे एसटी विभागाने गुरूवारी नाशिक, दादर, मुंबई बरोबरच नगर मार्गावर बस सेवा सुरू केली होती. पण, विदर्भ व मराठवाडा, सोलापूर, पंढरपूर परिसरात जाणाऱ्या बस बंद ठेवल्या होत्या. त्यामुळे गुरूवारी पुण्यातून जाणाऱ्या पाचशे फेऱ्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे एसटीचे ३० लाख रुपयांचे नुकसान झाले.

### प्रवाशांचे सुरू होते हाल

» मराठा समाजाच्या आंदोलनामुळे शनिवारी रात्रीपासून पुण्यातून मराठवाडा, विदर्भात जाणाऱ्या सर्व बस बंद करण्यात आल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांचे हाल सुरू होते. तसेच, एसटीचे देखील नुकसान होत होते. गेले दोन दिवस पुण्यातून जाणाऱ्या ७८० फेऱ्या रद्द केल्या जात होत्या. खासगी वाहन चालकांकडून प्रवाशांची लुटमार सुरू होती. अखेर गुरूवारी रात्री मराठा आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर एसटी महामंडळाने पुण्यातून त्यांची सर्व बस सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे विभागातून साधारण दिवसाला साडेतेराशे एसटी बसच्या फेऱ्या सुरु असतात. त्या सर्व पूर्ववत केल्या जाणार आहेत. तसेच, रात्री दहानंतर इतर आगाराच्या पुण्यात अडकून पडलेल्या बस रवाना केल्या जाणार आहेत, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.

# भिडेवाडा : रहिवाशांची याचिका न्यायालयाने फेटाळली

## एका महिन्यात जागा रिकामी करून महापालिकेला देण्याचे आदेश

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भिडेवाड्यासंदर्भातील स्थानिक रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका गुरुवारी न्यायालयाने फेटाळली. स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष करावा लागला, याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त करत याचिकाकर्त्यांना दंड का करू नये, अशी विचारणा करतानाच एक महिन्यामध्ये जागा रिकामी करून ती महापालिकेला हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाने रहिवाशांची याचिका फेटाळल्याने भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक होण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. भिडेवाड्यासंदर्भातील उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विरोधात रहिवाशी आणि व्यावसायिकांनी सर्वो




च्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर गुरुवारी न्यायमूर्ती ए. एस. बोपन्ना आणि पी. एस. नरसिम्हा यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष करावा लागतो, ही बाब खेदजनक आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. महापालिकेच्या वतीने वरिष्ठ वकील माधवी दिवाण आणि अॅड. मकरंद आडकर यांनी बाजू मांडली. महापालिकेच्या विधी विभागाच्या प्रमुख अॅड. निशा चव्हाण, भूसंपादन विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील, विशेष भूसपादन अधिकारी श्वेता दारूणकर, सहाय्यक वकील प्रणीव सटाले आणि शंतून आडकर यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न केले. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेल्या बुधवार पेठेतील भिडे वाड्याच्या जागेच्या भूसंपादनाशी निगडीत उच्च न्यायालयात दीर्घ काळ प्रलंबित असलेल्या खटल्याचा निकाल पंधरा दिवसांपूर्वी महापालिकेच्या बाजूने लागला होता. त्यामुळे भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक करण्याचा मार्ग मोकळा झाल्याने महापालिका प्रशासनाकडून भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. तसेच भिडेवाडा स्मारकाचा कच्चा आराखडाही

### स्मारकाचा मार्गही मोकळा

» महापालिकेने भिडेवाडा ताब्यात घेऊन तेथे राष्ट्रीय स्मारक करावे, असा ठराव फेब्रुवारी २००६ मध्ये मुख्य सभेने केला होता. त्यानंतर जानेवारी २००८ मध्ये स्थायी समितीने त्यास मान्यता देऊन भूसंपादनाद्वारे ही जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता स्मारकाचा मार्गही मोकळा झाला आहे.

महापालिकेकडून तयार करण्यात आला होता. मात्र, स्थानिक रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याने ही कामे रखडण्याची शक्यता निर्माण झाली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी एका महिन्याच्या आत जागा मोकळी करून महापालिकेला हस्तांतरीत करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याची आणि स्मारकाचे काम रखडल्याबद्दल दंड का करू नये, अशी विचारणा याचिकाकर्त्यांना केल्याची माहिती निशा चव्हाण यांनी दिली. महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली त्या ठिकाणी स्मारक करावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. मात्र या वाड्यात असलेले रहिवासी आणि व्यावसायिकांनी या वाड्याच्या भूसंपादनाबदल्यात योग्य मोबदला मिळावा, यासाठी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. गेल्या १३ वर्षांत न्यायालयात त्यावर तब्बल ८० वेळा सुनावणी झाली होती.